
ISSN - 2229 - 4929

# अक्षर वाङ्मय

४ मार्च २०२०




संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं.- MAHMAR-36829-2010

ISSN : 2229-4929

# अक्षर वाङ्मय

**०४ मार्च २०२०**

: संपादक :

**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

: कार्यकारी संपादक :

**डॉ. भास्कर ताम्हनकर**

: संपादक मंडळ :

**डॉ. शशिकांत श्रंगारे**
**डॉ. शीतल गोर्डे-पाटील**

: मार्गदर्शक :

**श्री. सागर फडके**

---

**प्रकाशक :** सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर-४१३५१५.

**मुद्रक :** कल्पना मल्टीटेक, ४६१/४ सदाशिव पेठ, पुणे-३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ.नानासाहेव सूर्यवंशी, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५, भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१,
ई-मेल : suryawanshinanasaheb67@gmail.com

**अक्षर जुळणी :** शिवाजी ज्ञा. पांचाळ, लातूर, भ्रमणध्वनी : ९७६६२४०१२६,
ई-मेल : shivajipanchal8@gmail.com

**स्वागत मूल्य :** रू.१,०००/-

---

*अक्षर वाङ्मयातील प्रकाशित मजकूराशी व लेखकांच्या मताशी प्रकाशक, संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.*

---

| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १८. | स्त्रीवादी साहित्य | डॉ.मनीषा आझाद नायकवडी | ८६ |
| १९. | 'अंधारवाटा' या महानगरीय कादंबरीतील स्त्रीवादाचे चित्रण | डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर | ९२ |
| २०. | सानिया यांच्या कथासाहित्यातून उमटलेला स्त्रीवाद- एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ९८ |
| २१. | नाशिक जिल्ह्यातील लोकोत्सवातील स्त्रीधन | प्रा. पंकज पवार | १०६ |
| २२. | स्त्रीवादी साहित्य-समीक्षा | डॉ. सागर अशोक लटके | ११३ |
| २३. | मेघना पेठे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री जाणीवा | डॉ. राजश्री बंडोपंत पोवार | ११७ |
| २४. | स्त्रीवादी साहित्य : भूमिका आणि स्वरूप | जयश्री शिंदे-गायकवाड | १२२ |
| २५. | 'आयदान' : स्त्रीवादी आकलन | डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे | १२९ |
| २६. | स्त्रीवादाचे स्वरुप आणि स्त्री सबलीकरणाची आजची स्थिती | डॉ. आनंद वारके | १३४ |
| २७. | मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीवा | डॉ. विजया प्रशांत पवार | १३९ |
| २८. | भारतीय लोकसाहित्यातून प्रकट होणारे 'स्त्री' जीवन | निवृत्ती मारोतराव टार्फे | १४७ |
| २९. | पौराणिक कादंबरीतून उमटलेला स्त्रीवाद | डॉ. सुवर्णा तानाजीराव जाधव | १५३ |
| ३०. | स्त्रीवादी संकल्पना आणि सिद्धांत | डॉ. प्रताप गायकवाड | १५९ |
| ३१. | कष्टकरी स्त्री जीवनाची कैफियत : डोंगरमाथा | सचिन माधवराव कोतकर | १६४ |
| ३२. | 'समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य' | श्रीरंग अरविंद तराळ | १६८ |
| ३३. | 'आयदान' मधील स्त्रीवादी जाणिवा | भारती श्रीधर कोळेकर | १७७ |
| ३४. | ओवी : 'स्त्री' जीवनातील विविधांगी अनुभव दर्शन' | संजय चव्हाण | १८४ |
| ३५. | एकविसाव्या शतकातील जबाबदार स्त्रीचे स्थान | अजितकुमार भिमराव पाटील | १९० |

अक्षर वाङ्मय : ISSN : 2229-4929

# 'आयदान' मधील स्त्रीवादी जाणिवा

भारती श्रीधर कोळेकर
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रास्ताविक**

भारतीय संस्कृतीचे जतन-संवर्धन करण्यात स्त्रियांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सिंधू संस्कृतीत मातृसत्ताक कुटुंब पद्धतीच्या माध्यमातून तिला विशेष अधिकार होते. तरीही इथल्या धर्म, संस्कृती, प्रथा, परंपरा, धर्मग्रंथ, पुरुषप्रधान संस्कृती इत्यादीमुळे तिचे स्थान गौणच आहे. धर्मग्रंथ व समाजव्यवस्थेने तिचे माणूस म्हणून असलेले स्वतंत्र अस्तित्वच नाकारले. अनेकांनी स्त्री उद्धार व स्त्री स्वातंत्र्यासाठी समाजकार्य करून आपल्या कृती-उक्तीतून स्त्री स्वातंत्र्याची जाणीव करून दिली. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटली तरीही आज स्त्री-मुक्ती व स्त्री-सुरक्षितता हे प्रश्न तितकेच मोठे व गरजेचे असल्याचे दिसून येतात.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. तिच्या अस्तित्वाची परिसीमा पिता, पती व पुत्र या त्री'प'दीत फिरणारी असून ती अस्मितेसाठी लढते आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तिला अनेक घटना-प्रसंग, संस्था-संघटना, चळवळींच्या माध्यमातून आपल्या नव्या रूपाची जाणीव होऊ लागली आहे. शिक्षण-नोकरी निमिताने स्त्रीला घराबाहेर राहावे लागल्याने व शिक्षणाने तिच्या आचार, विचार, कर्तृत्वाच्या क्षेत्रात बदलत झाल्यामुळे तिच्या पारंपरिक रूपातही अनेक बदल झाले. तिने पादाक्रांत केलेली विविध क्षेत्रे, तिच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची प्रसारमाध्यमांमधील प्रसिद्धी, तिच्या बाजूचे कायदे इत्यादी अनेक कारणांनी स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होऊ लागला. ठिकठिकाणी होणारी वासनाकांडे, एकतर्फी प्रेम प्रकरणे त्यातून होणाऱ्या हत्या-आत्महत्यांमुळे स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर येऊन संघटनांच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नावर विविध चळवळी, आंदोलने होऊन जनमत जागृत केले. त्यातूनच स्त्रीवादाचा उदय झाला.

**स्त्रीवाद व स्त्रीवादी साहित्य :**

स्त्रीवाद व स्त्रीवादी साहित्याच्या संकल्पना पुढील प्रमाणे-

"स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे, तिला तिचे हक्क अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे, तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून माणूसपणाचे नवे रूप धारण करणे म्हणजे स्त्रीवाद होय. तिला तिच्या गुलामीची जाणीव होणे आणि तिने आपल्या गुलामी विरुद्ध बंड करणे यालाच स्त्रीवाद असे नाव देता येईल."[१]

सिमॉन द बोव्हाच्या मते, "स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे, स्त्री प्रश्नांप्रती आस्था निर्माण करणे."[२]

यावरून स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्रियांनी 'स्व'विषयी व इतर स्त्रियांविषयी केलेले लेखन की ज्यामधून तिची अस्मिता, हक्क, अधिकार, शोषण इ.ची जाणीव होते व तिच्या 'स्व'चा शोध घेत स्वत्वाच्या जाणिवेतून माणूसपणासाठी नवनवी रूपे धारण करणारे असे साहित्य.

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी साहित्य असे अनेक प्रवाह उदयास आले. त्यामध्ये प्रामुख्याने १९८० नंतर दलित आत्मकथनांची निर्मिती झाल्यामुळे प्रस्थापित साहित्यविश्वात चांगलीच खळबळ माजली. या कालखंडातच दलित स्त्रियांनीही आपले अनुभव मांडण्यास सुरुवात केली. त्यामध्ये प्रामुख्याने शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, कुमुद पावडे, जनाबाई गिऱ्हे, शांताबाई दाणी इत्यादी लेखकांनी आपले जगणे आत्मकथनातून व्यक्त केले. यापैकीच दलित व स्त्रीवादी साहित्यात एक मैलाचा दगड ठरलेले आत्मकथन म्हणजे ऊर्मिला पवार यांचे 'आयदान'. आयदान मधून आलेले दलितांचे, दलित स्त्रियांचे व पश्चिम महाराष्ट्रातील दलित समाजाचे जीवन हे अपूर्व असे आहे. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात 'आयदान'मधील स्त्रीवादी जाणिवांचा अभ्यास करण्याचा मानस आहे.

**'आयदान' चे कथानक :**

'आयदान' ही रत्नागिरीजवळ फणसावळे या एका खेड्यात महार समाजात जन्मलेल्या, वाढलेल्या विमलची जीवन कथा असली तरी त्यानिमित्ताने रत्नागिरी परिसरातील व शहरातील दलित व दलित स्त्री जीवनावर प्रकाश टाकणारी जीवन कथा आहे. आईच्या धाकामुळे का असेना विमलला शिक्षणाची संधी मिळते. दारिद्र्याशी संघर्ष करत ती जगते. तिचा स्वइच्छेनुसार हरिश्चंद्राबरोबर विवाह होतो. पुढे नोकरीच्या निमित्ताने मुंबईत जाते. चळवळीतही सहभागी होते. त्यामुळे नवऱ्याशी भांडणही होते. अशा परिस्थितीतील तिच्या जगण्याचे चित्रण या आत्मकथनात येते. तसेच एका खेड्यातील मुलीला झालेली दलितत्वाची जाणीव व त्यातून आलेले शहाणपण व पुढे स्त्रीत्वाची झालेली जाणीव या अशा दुहेरी व्यवस्थेत तिला भोगावा लागणारा भोग, त्यातून तिच्या तावून सुलाखून निघालेल्या परिपक्व व प्रगल्भ व्यक्तिमत्वाचे चित्रण म्हणजे आयदान.

**'आयदान'मधील स्त्रीवादी जाणिवा -**

**१. आपल्या मुलींनी सक्षम व्हावं :**

सर्वसामान्य आई-वडीलांप्रमाणे ऊर्मिलाच्या आई-वडिलांची इच्छाही आपल्या मुलींनी शिकून स्वतःच्या पायावर उभे राहावे. तसेच सायकल चालवायला ही त्यांनी शिकलं पाहिजे असे तिच्या बाबांना वाटते. आपल्या मुलींच्या बाबतीत असा विचार करणारे बाबा पुतणी-सुशिलाच्या बाबतीत मात्र बेफिकीरपणानं वागतांना दिसून येतात, सुशिलेचा सासरी छळ होत असूनही तिला त्यातून मुक्त करण्याविषयी मौन बाळगतात.

तसेच विमल शाळेत उशिरा गेल्यावर गुरुजींनी तिला शेण भरायला लावले असता तिने दुर्लक्ष केल्यामुळे गुरुजींनी तिला मुस्काटात मारली. तेव्हा विमल घरी रडत आल्यानंतर आईला जेव्हा कारण समजते तेव्हा ती हेर्लेकर गुरुजींनी विनाकारण मारहाण केल्याबद्दल त्यांना चांगलीच तंबी देत म्हणते,"हे बगा! ह्याच्या म्होरं माझ्या पोरीला तुम्ही बॉट लावा. मग तुम्ही या रस्त्यानं कसं जाताव तं बगताच मी."[३] अशा कडक शब्दात दमदाटी करण्यामागे तिला असलेली मुलीच्या भवितव्याची चिंता दिसून येते. जर मुलीला असे मारले तर ही

उद्यापासून शाळेत जाणार नाही. परिणामी तिला समाजातील इतर स्त्रियांप्रमाणे, आपल्याप्रमाणे काबाडकष्ट करावे लागतील याची जाणीव तिला होते.

२. स्त्रीला स्वतःचं मत व सत्ता नसते :

पार्वती वहिनी ही स्वयंपाकाव्यतिरिक्त घरातील सर्व कामे मोलकरणीप्रमाणे करीत असे. पण तिला घरात स्वतःचं मत नव्हतं. तशी काडीची सत्ताही नव्हती. इतकेच नव्हे तर कधी भूक लागलीच तर आंबलेली आंबील सुद्धा ती स्वेच्छेनं खाऊ शकत नव्हती. 'आंबिलीचं मडकं धुण्याच्या निमित्ताने बाहेर आणून आंबील कशात तरी घेऊन ती प्यायची, सर्वांच्या नंतर जेवायची, अर्थात झोपायचीही शेवटीच.'[४]

३. प्रतिकूल परिस्थितीतही स्वावलंबी जीवन जगणाऱ्या स्त्रिया :

शांतीआक्काची नणंद हिरीआक्का. ही लग्नानंतर काही दिवसातच माहेरी येऊन राहिली. त्यानंतर तिला मुलगीही झाली. पण भावाला भार न होता ती बाहेरच्या पडवीत मोलमजुरी करून, पण स्वाभिमानाने जीवन जगते. आप्तस्वकियांच्या घरी जातानाही ती कधी रिकाम्या हाताने जात नाही. जाताना आपल्या ऐपतीप्रमाणे टोपलीभर कालवं, बोचणं घेऊन जाते. पण त्याचे पैसेही घेत नाही अथवा त्या मोबदल्यात एखादी वस्तूही घेत नाही.

४. खडतर जीवनाविषयी संताप व्यक्त करणाऱ्या स्त्रिया :

आयदानमधून आविष्कृत झालेले स्त्रीजीवन हे अत्यंत हलाखीचे आहे. गवताची वरंड, भात / नाचणीचा लाटा, चिव्याचा चेप किंवा आंबे, कैऱ्या, मोळ्या विकून दलित स्त्रियांना पोट भरावे लागे. त्यांना हा माल विकण्यासाठी फणसावळ्यापासून रत्नागिरीच्या बाजारला जावे लागत असे. तेव्हा कोकणातील डोंगरदऱ्या जंगली वाटा-आडवाटा तुडवत, ऊन-पावसाची तमा न बाळगता डोक्यावर ओझं घेऊन जावे लागत असे. त्यामुळे आपल्या वाट्याला आलेल्या खडतर आयुष्याविषयीचा संताप व्यक्त करताना त्या आपल्या पूर्वजांना शिव्या देत म्हणतात, "मेल्याचं मडं बसवलं ते- मेला हिकडं कुटं मराय आला? जल्लं मेल्याचं त्वाडं ते-..." 'रांडच्याचं काय डोल फुटलं हुतं...?' त्या आयझवाऱ्याला हे डोंगरघाटया, घबी रान दिसलं नाय? मेल्याच्या काटी पडली मुस्कटावर ती....."[५] असे म्हणत कौटुंबिक व सामाजिक पातळीवरचा जीवन संघर्ष करणाऱ्या स्त्रियांचा पट लेखिकेने टिपला आहे.

५. शोषित जीवनाचे चित्रण :

आयदानमध्ये कौटुंबिक जीवनात वेदना सोसणारी स्त्री सामाजिक जीवनातही आर्थिक व लैंगिक शोषणाची शिकार बनते. एकतर अतिशय कष्टाने डोक्यावरून मोळी वाहून आणायची आणि ती मोळी घेताना गिऱ्हाईकाकडून त्यांची मोठी फसवणूक होते- कधी मोळी खूप वाळली असल्याने लवकर जळून जाईल म्हणून किंवा तीच मोळी दुसरे गिऱ्हाईक मोळी ओली आहे, जळणार नाही म्हणून भाव कमी करून मागते. गिऱ्हाईकाच्या अशा दुहेरी शोषणात या स्त्रिया सापडल्या आहेत.

तर कधी त्यांच्या अज्ञानाचा फायदा उठवत दुकानदार दोन आणे घेऊन प्रत्यक्ष एक आण्याचे तेल देतो. तर मासे विकत घेताना त्यांच्या पदरी कुजलेले मासे पडतात. तर एखादे गिऱ्हाईक या स्त्रियांच्या असहाय्यतेचा

फायदा उठवते व त्यांचे लैंगिक शोषणही करते. भाताच्या पेढा विकणाऱ्या एका स्त्रीला म्हातारे गिऱ्हाईक डोळा मारते. आपल्याला आलेला हा अनुभव सांगताना ती म्हणते, "एक मेला धोतर नेसलेला आला नि सारका डोळा मारीत गवत रापून बगाया लागला,.... तुला घेयाचं असंल त घे. त त्या मेल्यानं पटकन धोतार बाजूला करून नाग दावलान्."[4] आपल्या होत असलेल्या आर्थिक व लैंगिक शोषणाची जाणीव या स्त्रियांना होत असली तरी त्या हा अन्याय निमूटपणे सहन करण्याशिवाय काहीही करू शकत नाहीत. पण अशा गिऱ्हाईकाला त्या परखडपणे खडसावतात, आपल्या विदारक स्थितीला कारणीभूत मूळ पुरुषांना शिव्या घालतात.

एक दिवस विमल शाळेत उशिरा आली. शिक्षा म्हणून तिला शेण भरायला सांगितले पण विमलने दुर्लक्ष केल्यामुळे गुरुजींनी चिडून तिला मुस्काटात मारली व त्याचे समर्थन करताना 'तुमची पांढरी गाय शाळेत शेणते....'[5] असे म्हणतात.

एका विशिष्ट जातीवादी व्यवस्थेकडून शोषित ठरणारा हरिश्चंद्रही जेव्हा दुसऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेच्या आधारे उर्मिलाचे शोषण करत होता हे स्त्री संघटनेत कार्य करू लागल्यानंतर दोघांच्यात होणारी भांडणे व अनेक प्रसंगातून दिसून येते.

६. जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य :

उर्मिलाचे व हरिश्चंद्रचे प्रेम प्रकरण असल्याने एक दिवस ती घरच्यांच्या तोंडाला काळे फासेल या हेतूने तिला मुंबईला भावाकडे पाठवली जाते. पण उर्मिलाने अनेक शिक्षित स्थळे नाकारून हरिष्चंद्रा ने रीतसर मागणी घातल्यानंतर आपल्या आई-वडिलांचा व नातेवाईकांचा विरोध पत्करून आपले भविष्य आपणच घडवू या आत्मविश्वासाने हरिश्चंद्राची जोडीदार म्हणून निवड करते व आपल्या आवडीचे 'उर्मिला' हे नाव नवऱ्याला पटवून धारण करते.

शिक्षण व स्त्री संघटनेतील कार्य यामुळे उर्मिलेचे विचार लग्नानंतर पुरोगामी बनले होते तिने आपल्या मोठ्या मुलीला मालाविकालाही जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य दिले पण जातीमुळे कदाचित मुलाकडून नकार येईल म्हणून ती गप्प बसते पण आई-वडिलांनी ठरविलेल्या प्रत्यक्ष लग्नावेळी रवीने तिच्यावरचं प्रेम जाहीर करताच उर्मिला नवरा व नातेवाईकांचा विरोध पत्करून मालविकाचं रवीसोबत लग्न लावून देते. पण जेव्हा मालविकाचा पूर्वनियोजित वर; उदयच्या घरची माणसे धाकट्या मुलीला-मानिनीला लग्नाची मागणी घालतात तेव्हाही मानिनीच्या इच्छेविरुद्ध हरिश्चंद्र व उर्मिला जात नाहीत. मानिनीच्या इच्छेने उदयला नकार कळवितात.

७. पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व / पगडा :

पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा या समाजव्यवस्थेवर वर्षानुवर्षे पडला असल्याचे जाणवते मुला-मुलींच्या जन्मापासूनच शरीराच्या ठेवणीविषयी बायका ठोकताळे बांधत हे सांगताना उर्मिला सांगते, मालिश करताना मुलींच्या हाताचे पंजे लहान करण्यासाठी मुठी आवळणे, ढुंगण दिसू नये म्हणून तिला वरून खाली मालिश करायचे – दाबायचे, कुशी व कटींवर जादा दाब द्यायचा जीव घुसमटेपर्यंत नाक दोन्ही अंगठ्यांनी वर उचलायचे. याउलट मुलांचे हात पाय पसरट हवेत म्हणून अंगठ्याने दाबायचे ढुंगण खालून वर दाबायचे व नाकाला तर धक्का सुद्धा लावायचा नाही.

मुलींनं काय बोलावं लिहावे व काय बोलू-लिहू नये याची घडण करणारे संस्कार तर ती लहानाची मोठी होताना (वयात आल्यावर) सातत्याने केले जातात. शिवाय मुलीच्या लग्नानंतर नवरीने पाणोठ्यावरून पाणी आणणे, सासऱ्याने 'मी काशीला निघालो'सारखे सुनेला वेसन घालणारे, बंधनात अडकविणारे खेळ म्हणजे पुरुषसत्ताक व्यवस्थेत सुनेने कसे वागावे याची शिकवण होय.

उर्मिलाचा पाय मोडल्यामुळे बी.ए.च्या अभ्यासात खंड पडला. अभ्यास भरून काढण्यासाठी तिच्या मैत्रिणीचा विवाहीत भाऊ बंधू प्रेमाने तिला पुस्तके, नोट्स देतो व स्वतःच्या घरी अभ्यास करण्यासाठी बसण्याची मदत करतो. पण मैत्रिणीच्या मनावर मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेचा प्रचंड पगडा असल्याने ती म्हणते, "ए, तुला माहीत आहे ना, भाऊची बायको त्याच्या जवळ राहत नाही तरीही तू त्याच्याकडे जात होतीस? लोक काय म्हणत असतील?"[८]

साहित्य संमेलनात उर्मिलेने कथाकथन करायला जाताना मुलाला सोबत घ्यायचं असा आग्रह हरिश्चंद्र करतो. कारण कथेतील नायिकेला पाच मुली होत्या व कथेतील नायिका म्हणजे उर्मिला नव्हे. कारण उर्मिलाला प्रत्यक्षात एक मुलगा आहे. हे हरिश्चंद्रला दाखवून द्यायचं होतं.

अपत्य जन्माला घालणं किंवा न घालणं या गोष्टीवरही पुरुषांचेच वर्चस्व होते. म्हणून दुसरी मुलगी झाल्यानंतरही हरिश्चंद्र आपल्याला आणखी एक मुलगा हवा बुवा म्हणतो मग उर्मिला तिसरा चान्स घेते हे ही अगदी त्याच्या म्हणण्यामुळे आणखी एक कप चहा घेतल्याप्रमाणे. तसेच उर्मिलाने एम.ए.ला प्रवेश घेतला आणि हरिश्चंद्राला आपली बायको आता आपल्या पुढे गेली, आपल्या कह्यात राहिली नाही ही जाणीव त्याला पुरुषसत्ताक व्यवस्थेतून झाली आहे.

आईला मुलगा व मुलगी सारखीच असतात पण या व्यवस्थेत मुलग्याचे अस्तित्व महत्त्वाचे आहे समाजाला मुलाच्या मृत्यूचे दुःख आहे पण मुलीच्या मृत्यूचं दुःख तितकं वाटत नाही. म्हणूनच उर्मिलाच्या भावाच्या मृत्यूवेळी भेटायला येणाऱ्या स्त्रियांमधील एक स्त्री म्हणते, "या तीन बहिणी नि त्यांचे तीन भाऊ होते ना?......त्यातले दोन भाऊ गेले नि बहिणी राहिल्या त्याऐवजी बहिणीतलीच का नाही कुणी गेली?"[९]

गरोदरपणा किंवा प्रसूती ही खास स्त्रीचे अनुभव क्षेत्र असले तरी ते स्व-तंत्र व स्वतंत्र नाही. गरोदरपणासाठी पुरुषाचे सहकार्य जसे महत्त्वाचे आहे तसेच स्त्रीने मूल केव्हा जन्माला घालावे, घालावे की घालू नये, मुलीला जन्माला येऊ द्यायचे की नाही या सगळ्या गोष्टीवर पुरुषांनी आपला अधिकार राखून ठेवला आहे. त्यामुळे या सर्व बार्बीवर पुरुषी सत्तेचे आक्रमण झालेले तिलाही कळते अपरिमित वेदना सोसूनही स्त्रिया स्वतःची शारीरिक हेळसांड त्या टाळू शकल्या नाहीत. मग ते कुटुंब दरिद्री असेल तर त्याला पारावरच राहत नाही. भिकीआक्काच्या नवऱ्याने दुसरी बायको केल्यानंतर तिच्या वाट्याला अघोरी मारहाण, शिव्याशाप, उपासमार येते. पण तरीही तिची या वाळंतपणा मधून सुटका होत नाही. भिकीआक्काचे रोज ऊर फुटेस्तोवर घाटी चढून उतरून संसारासाठी कष्ट उपसणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याचे भोग केवळ जातीव्यवस्थेने निर्माण केले नसून ते पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम स्थानावर ठेवलेल्या व्यवस्थेच्या विचार पद्धतीतून निर्माण झाले आहेत. भिकीआक्काची सवत भिकीआक्काचे शोषण करते, पण तिला आपला नवराही आपले शोषण करत आहे हे

आयुष्यभर उमगत नाही. आपली मनोवृत्ती, आचार-विचार पद्धती ही पुरुषधार्जिण्या व्यवस्थेच्या संस्कारानी घडली आहे. त्यामुळे दोन स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक कष्टावर एक पुरुष सुखनैव पद्धतीने सर्व प्रकारचे लाभ उठवत आहे हेही तिला जाणवत नाही. पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या संस्कारानी तिला व तिच्यासारख्या अनेक स्त्रियांना परात्म बनविले आहे. पुरुषांचे हीत जपताना प्रत्येक स्त्री दुसऱ्या स्त्रीचे स्वतः ती अथवा पुरुषाच्या संगनमताने शोषण करत आहे याची जाणीव स्त्रियांना होत नाही. अशा शोषणाच्या अनेक तऱ्हांचे व पुरुषप्रधान संस्कृती वर्चस्वाचे, व्यवस्थेचे स्त्री शोषणाचे चित्रण आयदान मधून पानोपानी दिसून येते.

८. **आत्मभान / स्त्री अस्मिता :**

'मैत्रीण' ग्रुपमध्ये जाण्यापूर्वी उर्मिला आपण एक स्त्री आहोत या जाणिवेत होती आणि ही स्त्रीपणाची जाणीव पुरुषी व्यवस्थेतून आली होती. पण या ग्रुपमध्ये गेल्यापासून तिच्यात झालेले बदल, तिला तिच्यातील स्त्रीत्वाची जाणीव करून देतात. त्यामुळे एका स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून आलेले तिचं आत्मभान, जागरूकता हरीश्चंद्राला अस्वस्थ करते तिने नोकरी, प्रवास, घरकाम करूनही रात्री नवऱ्याची सेवा करूनही तो मात्र तिला तू आदर्श पत्नी, गृहिणी आणि इतकंच काय तर तू आईही नाहीस असं म्हणण्यात आनंद मानतो. तिची स्वतःची निर्माण झालेली ओळख त्याच्या मनाला अस्वस्थ करते त्यामुळे उर्मिलाला त्याचे दोन पातळीवरचे वर्तन जाणवते. एका बाजूस आपली पत्नी लिहिते बोलले याबद्दलचे कौतुक तर दुसऱ्या बाजूस तिच्या लिहिण्या-बोलण्याबद्दलचा त्याला येणारा राग त्यावरून त्या दोघांची भांडणेही होत. पण तिची अस्मिता तिला गप्प बसू देत नव्हती मग तीही बोलून जायची, “अहो, मला जीव आहे मीही तुमच्यासारखे नोकरी करते. थकते. माझ्या वागण्याला, कामाला तुमच्याइतकंच मोल आहे.”

खरेतर लहानपणापासून हरिश्चंद्रने आपल्या बायकोचं जगणं-वागणं पाहिलं असूनही आताच कशी काय हिला शिंगं फुटली, आता ती वेळीच छाटली पाहिजेत असा दुबळा विचार त्याच्या मनात येतो तेव्हा ती म्हणते, “पण आता माझी शिंगं त्याच्या हातात येण्यासारखी राहिली नव्हती ती भलतीच जोमानं वाढायला लागली होती.”[१०]

इतर पुरुषांप्रमाणे हरिश्चंद्रच्याही उर्मिलाकडून घर सांभाळणे, मुले सांभाळणे, त्यांचा अभ्यास घेणे अशा स्वाभाविक अपेक्षा आहेत. पण उच्च शिक्षणाने स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाल्याने ती या बाबींना डावलून परखडपणे पतीला सुनावते, “तुम्ही जरा घरात लक्ष द्या. बारमध्ये जाण्याऐवजी घरी लवकर आलात, मुलांचा अभ्यास घेतलात तर बरं होईल.”[११] ही तिला स्त्रीवादी संघटनेने दिलेली नवी जाणीव आहे. तसेच पतिनिधनानंतर हिंदुधर्मातील पारंपरिक विधींना नाकारून पतीच्या पावलावर मंगळसूत्र तोडून बांगड्या फोडून केसातील फुलांची वेणी ओरबाडणे, पतीच्या डाव्या पायाच्या अंगठ्याने पत्नीचं कुंकू पुसणे हे सगळे थोतांड मानून व त्या स्त्रीचा अपमान मानून तो विधी नाकारते. उर्मिलाने हरिश्चंद्राला दिलेली उत्तरे म्हणजेच तिला संघटनेतून आलेले आत्मभान होय.

'मैत्रीण' ग्रुपच्या सहवासात आल्यामुळे तिचे सामाजिक भान तर प्रागल्भ होऊन या भानाच्या कक्षाही रुंदावतात. त्यातूनच तिची स्त्री अस्मिता व तिच्या अस्तित्वासंबंधीची दृष्टी विकसित होते. ती प्रसंगानुरूप

आपली स्वतःची मते मांडते. एका बाजूला स्त्री ही सुद्धा पुरुषाप्रमाणे एक व्यक्ती आहे. व्यक्तीला मिळणारे सर्व अधिकार तिला मिळाले पाहिजेत; "पुरुषाकडे मसल पॉवर असेल तर स्त्रीकडे जननशक्ती आहे. या दोन शक्ती वेगवेगळ्या आहेत. त्यांचे एकत्रित मूल्यमापन न होता स्वतंत्रपणे झालं पाहिजे वगैरे अनेक विचारांचे बीजांकुर माझ्या मनात फुलत होते."[११] यातूनच प्रेरित होऊन ती 'दलित चळवळीतील स्त्रियांचे मूल्यमापन' या विषयावर पीएच.डी. च्या तोलाचं संशोधन करते आणि झपाटल्यासारखं लेखनही करत राहते.

निष्कर्ष :

१. आयदानमध्ये रूढ अर्थाच्या स्त्रीवादाबरोबर ऊर्मिलाचे आत्मभान प्रकर्षाने जाणवते.

२. आयदानमधील स्त्रियांचे कुटुंबासाठी प्रचंड कष्ट उपसणे, ऊर फुटेतोवर चालणे व वाट्याला आलेले दुःख मुकपणे सहन करणे हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे द्योतक आहे.

३. आयदान मधील स्त्रीवादावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा ठसा असल्याचे स्पष्टपणे दिसते.

४. स्त्रीच्या गुलामीपासून स्त्री-स्वातंत्र्यापर्यंतची लेखिकेची संघर्षमय वाटचाल ही स्त्रीवादी जाणिवेतून झाली आहे.

५. आयदान हे मनुष्यत्वाचे व जातीयतेचे भान आलेल्या स्त्रीचे तसेच ते पुरुषसत्ताक व्यवस्थेचे षडयंत्र उमगलेल्या, स्त्रीत्वाचे भान असलेल्या स्त्रीचे आत्मकथन आहे.

६. आयदान मधील अनुभवविश्व हे स्त्रीवादातून निर्माण झालेल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेस अधोरेखित करते.

७. ऊर्मिलावर अथवा इतर स्त्रियांवर कितीही अन्याय झाले, शोषण झाले तरी त्यातून पुरुषद्वेषाची धार दिसून येत नाही.

८. यामधील स्त्रियांचा संघर्ष केवळ 'पुरुषा'विरुद्ध नसून पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आहे.

संदर्भ :

1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशित, *ग्रामीण दलित व स्त्रीवादी साहित्य प्रवाह*, पृ.क्र. १११ व ११२.
2. भावे, रचना, *स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप*, कोल्हापूर, अक्षरदालन, प्रथमावृत्ती, २०१३, पृ.क्र. २०.
3. पवार, ऊर्मिला, *आयदान*, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन, पाचवे पुनर्मुद्रण, ६ एप्रिल २००७, पृ.क्र. ५५.
4. तत्रैव, पृ.क्र. ३५.
5. तत्रैव, पृ.क्र. ०२.
6. तत्रैव, पृ.क्र. ०८.
7. तत्रैव, पृ.क्र. ५५.
8. तत्रैव, पृ.क्र. २०३.
9. तत्रैव, पृ.क्र. २५२.
10. तत्रैव, पृ.क्र. २०९.
11. तत्रैव, पृ.क्र. २०३-२०४.
12. तत्रैव, पृ.क्र. २०९.